*Indian Streams Research Journal*
*Vol - I , ISSUE - V [ June 2011 ]* ISSN:-2230-7850

# वर्धा जिल्हयातील आदिवासी महिलांच्या विकासात स्वंयसहाय्यता बचत गटाचे योगदान

प्रा. मिलींद ए. सवाई
डॉ. आबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.

**सारांशः-**

प्रस्तुत अध्ययनात वर्धा जिल्हयातील आदिवासी महिलांच्या विकासात स्वंयसहाय्यता बचत गटाने वठविलेली भूमिका व केलेल्या योगदानामुळे झालेल्या सामाजिक आर्थिक विकासाचे मोजमापन करण्यावर विशेष लक्ष केन्द्रीत करण्यात आले. त्यासाठी नमुना स्वंयसहाय्यता बचत गटाचे सभासदत्व स्विकारण्यापूर्वी व नंतर निरनिराळया बाबींवर प्रतिसाद मिळवून प्राप्त माहितीच्या आधारे त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासांचा दर्जा ठरविण्यात आला.

**मुख्य शब्दः-** स्वंयसहाय्यता बचत गट, सामाजिक व आर्थिक स्थितीत व सक्षमीकरण.

**प्रस्तावनाः-**

सामाजिक व आर्थिक विकास ही प्रक्रिया जलद गतीने घडवून येणारी प्रक्रिया नसुन ती पूर्ण होण्यासाठी तुलनात्मकदृष्टया बराच वेळ लागतो ग्रामीण आदिवासी महिला स्वंयसहाय्यता बचत गटात सहभागी होण्यापूर्वी तसे पाहिले असता घर व मूल या क्षेत्रातच रमलेल्या असतात. सर्वप्रथम आर्थिक उन्नतीची कल्पना त्यांना आकर्षीत करते, त्या स्वंयसहाय्यता बचत गटात सामील होतात त्यानंतर स्वंयसहाय्यता बचत गटातील महिलांशी त्यांचा परिचय होतो सर्वाचे स्वभाव कळतात. नंतर हळूहळू स्वंयसहाय्यता बचत गटा व्यतिरिक्त इतर स्थानिक सामाजिक संस्थाचे अस्तित्व कळते. त्या संस्थाच्या कार्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी होतात त्यामुळे मित्र शेजारी, नातेवाईक यांच्याशी संपर्क होतो व विशिष्ट प्रकारचे संबंध प्रस्तावित होतात त्यांच्या सहभागामुळे त्यांचे महत्त्व कळून त्यांना सामाजिक कार्यात व कुटुंबात प्रतिष्ठा लाभुन निर्णय प्रक्रियेसाठी प्राधान्य आपोआपच मिळू लागते. त्याचप्रमाणे स्वंयसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक नमुना निवड आदिवासी महिलेला कमी जास्त प्रमाणात कर्ज उपलब्ध होते व ते मिळालेल्या कर्जाचा उपयोग त्यांना इच्छित उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी केला असावा असे निश्चित म्हणता येईल. त्या आदिवासी महिलांनी आपला उद्योग व्यवसाय काळजीपूर्वक व योग्य प्रकारे केला व त्यात त्या यशस्वी झाल्यात तसेच मिळालेल्या नफयातुन उत्पन्नाचे स्त्रोत वाढविले योग्यरित्या स्वंयसहाय्यता बचत व गुंतवणुक केली, पर्यायाने त्यांचे राहणीमान उंचावले अर्थातच त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकास साधला गेला. त्यांच्या तुलनेत अत्यंत समाधानकारक विकास झालेल्यांचे प्रमाण थोडे कमी आहे. परंतु असमाधानकारक विकास झालेल्या महिलांचे प्रमाणे थोडया प्रमाणात दिसून येते. यावरून असे वाटते की सदर महिला आपला आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यास असमर्थ ठरल्या असे म्हणावे लागेल.

स्वंयसहाय्यता बचत गट सदस्या नमुना निवड आदिवासी महिलांना उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक विकास प्रक्रियेत अनुभवास येणाऱ्या अडचणी.

स्वंयसहाय्यता बचत गट अस्तित्वात आल्यापासून आदिवासी महिलांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी एक दालन निर्माण झाले आहे. स्वंयसहाय्यता बचत गटात नियमितपणे मासिक वर्गणी भरून त्यांचा बॅकेतील भरणा, बॅकेतील रक्कम वाढल्यानंतर बॅकेकडून स्वंयसहाय्यता बचत गटांना त्यातील सभासदांना उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज दिल्या जाते. कर्ज मिळतांना पर्यायाने होणाऱ्या सामाजिक व आर्थिक विकास हे जाणून घेणे एका उद्दिष्टानुसार गरजेचे आहे.

**सारणी क्रमांक १: स्वंयसहाय्यता बचत गटात सहभागितेचा बचत गट आदिवासी महिलांच्या जीवनावर झालेल्या प्रभावासंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटात सहभागितेचा जीवनावर झालेला प्रभाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| सकारात्मक | ६९० | ९२.० |
| सामान्य | ६० | ८.० |
| **एकूण** | ७५० | १००.० |
| **Chi-Square** | **df** | **Sig** |
| **256.659** | **1** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गटात सहभागितेचा बचत गटातील आदिवासी महिलांच्या जीवनावर झालेल्या प्रभावासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९२.० टक्के स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या जीवनावर बचत गट सहभागितेचा सकारात्मक प्रभाव झाला आहे. तसेच ८.० टक्के स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या जीवनावर बचत गट सहभागितेचा सामान्य प्रभाव झाला आहे. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या जीवनावर बचत गट सहभागितेमुळे होणाऱ्या प्रभावानूसार वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३५७.१४८; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेचा जीवनावर सकारात्मक प्रभाव झालेल्या बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: स्वंयसहाय्यता बचत गट आदिवासी महिलांच्या आर्थिक स्थितीत बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| स्वंयसहाय्यता बचत गटातील सहभागामुळे आर्थिक स्थितीत सुधारणा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ६९० | ९२.० |
| नाही | १७ | २.३ |
| सांगता येत नाही | ४३ | ५.७ |
| **एकूण** | ७५० | १००.० |
| **Chi-Square** | **Df** | **Sig** |
| **542.697** | **2** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या आर्थिक स्थितीत बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९२.० टक्के स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या आर्थिक स्थितीत स्वंयसहाय्यता बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली असून बचत गटात सहभागामुळे आर्थिक स्थितीत काही सुधारणा न अनुभवणाऱ्या स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांची टक्केवारी २.३ टक्के होती. तसेच ५.७ टक्के बचत गट सदस्यांनी बचत गट सहभागामुळे आर्थिक स्थितीत झालेल्या सुधारणासंबंधी अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या आर्थिक स्थितीत बचत गटातील सहभागामुळे झालेल्या सुधारणानूसार वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ५४२.६९७; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे आर्थिक स्थितीत सुधारणाा झालेल्या बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ३: स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या जीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| **बचत गटातील सहभागितेमुळे जीवनमानच्या स्तरात सुधारणा** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ७४२ | ९८.९ |
| सांगता येत नाही | ०८ | १.१ |
| **एकूण** | ७५० | १००.० |
| **Chi-Square** | **Df** | **Sig** |
| **334.183** | **1** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या जीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९८.९ टक्के स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्याजीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली आहे. तसेच १.१ टक्के स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांनी बचत गट सहभागामुळे जीवनाच्या स्तरात झालेल्या सुधारणासंबंधी अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या जीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे झालेल्या सुधारणानूसार वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३३४.१८३; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे जीवनाच्या स्तरात सुधारणाा अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ४: स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या स्वंयसहाय्यता बचत गटातील सहभागामुळे कौटुंबिक निर्णय पद्धतीमध्ये लाभलेल्या सहभागासंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटातील सहभागामुळे कौटुंबिक निर्णय पद्धतीमध्ये सहभाग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७४२ | ९८.९ |
| सांगता येत नाही | ०८ | १.१ |
| **एकूण** | ७५० | १००.० |
| **Chi-Square** | **Df** | **Sig** |
| **334.183** | **1** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांचा बचत गटातील सहभागामुळे कौटुंबिक निर्णय पद्धतीमध्ये लाभलेल्या सहभागासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९८.९ टक्के स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांचा बचत गटातील सहभागामुळे कौटुंबिक निर्णय पद्धतीमध्ये सहभाग वाढला आहे. तसेच १.१ टक्के स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांनी बचत गट सहभागामुळे कौटुंबिक निर्णय पद्धतीमध्ये वाढलेल्या सहभागासंबंधी अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, स्वंयसहाय्यता बचत गटातील सदस्यांचा बचत गटातील सहभागामुळे कौटुंबिक निर्णय पद्धतीमध्ये वाढलेल्या सहभागा नूसार वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३३४.१८३; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे कौटुंबिक निर्णय पद्धतीमधील सहभागितेत वाढ अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्यातूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ५: स्वंयसहाय्यता बचत गटातील सहभागितेमुळे वर्धा जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटातील सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७१८ | ९५.७ |
| सांगता येत नाही | ३२ | ४.३ |
| **एकूण** | ७५० | १००.० |
| **Chi-Square** | **df** | **Sig** |
| **323.189** | **1** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक ५ मध्ये बचत गटातील सहभागितेमुळे वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांना सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९५.७ टक्के स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांना बचत गटातील सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर

मिळणाऱ्या सन्मानात वाढ झाली आहे. तसेच ४.३ टक्के स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांनी बचत गट सहभागामुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढसंबंधी अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, स्वंयसहाय्यता बचत गटातील सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात झालेल्या वाढीनूसार वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३२३.१८९; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ६: स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटामुळे परिसरातील स्त्रियांचे सक्षमीकरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७०९ | ९४.६ |
| सांगता येत नाही | ४१ | ५.४ |
| **एकूण** | ७५० | १००.० |
| **Chi-Square** | **Df** | **Sig.** |
| **285.951** | **1** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक ६ मध्ये वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९४.६ टक्के बचत गटातील आदिवासी महिलांच्याराहत्या परिसरात स्वंयसहाय्यता बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले आहे. तसेच ५.४ टक्के स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांनी राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असण्याबाबत अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, स्वंयसहाय्यता बचत गटातील आदिवासी महिलांच्या राहत्या परिसरात बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गटातील सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – २८५.९५१; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच वर्धा जिल्ह्यातील राहत्या परिसरात स्वंयसहाय्यता बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले असणाऱ्या स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**निष्कर्ष:-**

वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गटातील सहभागितेचा आदिवासी महिलांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव झाला असून, स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे आदिवासी महिलांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे. स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे जीवनाच्या स्तरात सुधारणा अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे. वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे सदस्यांची कौटुंबिक निर्णय पद्धतीमधील सहभागितेत वाढ झाली आहे. स्वंयसहाय्यता बचत गट आदिवासी महिलांच्या सामाजिक सहभागात बचत गटामुळे वाढ झाली आहे. वर्धा जिल्ह्यातील स्वंयसहाय्यता बचत गट सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ अनुभवणाऱ्या स्वंयसहाय्यता

बचत गट सदस्यांची संख्या इतर आदिवासी महिलांच्यातूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे. स्वंयसहाय्यता बचत गट सदस्यांचा बचत गटातील सहभागितेमुळे आत्मविश्वास व आत्मसम्मान वाढला आहे. बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले आहे.

**संदर्भ**

१) महिला व बालकल्याण शासन निर्णय, यशदा प्रकाशन पुणे.
२) मुलाणी एम.यु., (२००८), अल्पबचत नियोजन (बचत गट), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ. ११.
३) मुलानी, एम.यु. (२००६).'महिला स्वयंसहाय्यता बचतगट' डायमंड पब्लीकेशन पुणे -३० पेज. ५८-५९.
४) चौधरी, राजेश 'महिला बचत गट हस्तपुस्तीका' चौधरी लॉ पब्लीशर्स जळगांव, पुणे. पेज ९१ ते ९३.
५) गोटे, शुभांगी (२००४). 'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या' वरद पब्लीकेशन औरंगाबाद पेज नं. ६५ -८५